# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.३२६५ / २३ /अ.क्र.८८०३, ८८०४ /२५**

श्री.तय्यब बशिर गडकर

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नापु-३१)
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर-४१६००३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (नापु-३१)
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

अपिलार्थी श्री.तय्यब बशिर गडकर रा.इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर हे प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस हजर नाहीत.

तथापि, अवर सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी सादर केलेल्या खुलाशात नमूद केल्याप्रमाणे मूळ माहिती अर्ज यातील विषय जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांच्या अखत्यारितील असल्याने दि.२९.१२.२०२२ रोजी **कलम ६ (३)** नुसार मूळ माहिती अधिकार अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

वरील अर्ज दाखल करण्याच्या आधी अपिलार्थींनी याच विषयाबाबत शासनाकडे केलेल्या तक्रार अर्जावर दि.०२.०७.२०२१ रोजी व्यक्तीश: लक्ष देवून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांना या आधीच देण्यात आले असून अपिलीय अधिकाऱ्यांनीही जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती एक आठवडयात उपलब्ध करण्याचे सुस्पष्ट

निर्देश दिले असून वरील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज दाखल करण्यात आला आहे.

शासन स्तरावर तसेच अपिलीय अधिकाऱ्यांनी सुस्पष्टपणे जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांनी नियमानुसार कार्यवाही करुन अपिलार्थींना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याबाबत दिलेल्या निर्देशांचे अनुपालन न होणे ही बाब गंभीर असून संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयाने अपिलीय अधिकाऱ्यांचा दि.२२.०२.२०२३ चा आदेश तसेच शासनाने दि.०२.०७.२०२१ रोजी दिलेल्या निर्देशाचे तात्काळ अनुपालन करुन कार्यालयीन अभिलेखात केलेल्या कार्यवाहीचे उपलब्ध असलेली दस्तऐवज स्वरुपातील माहिती अपिलार्थींना अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग व आयोग यांना तात्काळ प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**